रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 1 ] | नई दिल्ली, फरवरी 20–26, 2025/फाल्गुन 1-7 (शक) 1946 | [खंड 22 |
| No. 1 ] | NEW DELHI, FEBRUARY 20-26/PHALGUNA 1-7 (SAKA) 1946 | [Vol. 22 |
| अं. १ ] | नवी दिल्ली, फेब्रुवारी २०-२६, २०२५/फाल्गुन १-७ (शके) १९४६ | [खंड २२ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि मेइन्टिनन्स् ऑर्डर्स् एन्फोर्समेन्ट ॲक्ट, 1921 ; (2) दि कलेक्शन् ऑफ स्टेटिस्टिक्स ॲक्ट, 2008 ; (3) दि सेन्ट्रल एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स् (रिझर्वेशन् इन टिचर्स काडर) ॲक्ट, 2019 ; (4) दि मुस्लिम वुमेन (प्रोटेक्शन् ऑफ राइटस् ऑन मॅरेज) ॲक्ट, 2019 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड़ (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Maintenance Orders Enforcement Act, 1921 ; (2) The Collection of Statistics Act, 2008 ; (3) The Central Educational Institutions (Reservation in Teachers' Cadre) Act, 2019 ; (4) The Muslim Women (Protection of Rights on Marriage) Act, 2019 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि मेइन्टिनन्स् ऑर्डर्स् एन्फोर्समेन्ट ॲक्ट, १९२१ ; (२) दि कलेक्शन् ऑफ स्टेटिस्टिक्स ॲक्ट, २००८ ; (३) दि सेन्ट्रल एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स् (रिझर्वेशन इन टिचर्स काडर) ॲक्ट, २०१९ ; (४) दि मुस्लिम वुमेन (प्रोटेक्शन ऑफ राइटस् ऑन मॅरेज) ॲक्ट, २०१९ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

## निर्देशसूची

## INDEX


| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | निर्वाह आदेशांची अंमलबजावणी अधिनियम, १९२१<br>The Maintenance Orders Enforcement Act, 1921 | ५ |
| २ | आकडेवारी संग्रहण अधिनियम, २००८<br>The Collection of Statistics Act, 2008 | ११ |
| ३ | केंद्रीय शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०१९<br>The Central Educational Institutions (Reservation in Teachers' Cadre) Act, 2019 | २१ |
| ४ | मुस्लिम महिला (वैवाहिक हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९<br>The Muslim Women (Protection of Rights on Marriage) Act, 2019 | २५ |

# निर्वाह आदेशांची अंमलबजावणी अधिनियम, १९२१

## (१९२१ चा अधिनियम क्रमांक १८ )[१]

[१७ ऑगस्ट, २०२३ रोजी यथाविद्यमान]

[५ सप्टेंबर, १९२१.]

[२][[३] * * * * [४][ प्रतियोगी राज्यक्षेत्रांमध्ये ], [५] * * * दिलेल्या निर्वाह आदेशांची [६][ भारतात ], आणि [६][ भारतात ], दिलेल्या निर्वाह आदेशांची [२][[३] * * * * [४][ प्रतियोगी राज्यक्षेत्रांमध्ये ], [५] * * * * अंमलबजावणी सुकर करण्याकरिता अधिनियम.

ज्याअर्थी, [२][[३] * * * * [४][ (प्रतियोगी राज्यक्षेत्रांमध्ये) ], [५] * * * यामध्ये दिलेल्या निर्वाह आदेशांची [६][ भारतात ], आणि [६][ भारतात ], दिलेल्या निर्वाह आदेशांची [२][[३] * * * * [४][ प्रतियोगी राज्यक्षेत्रांमध्ये ], [५] * * *, अंमलबजावणी सुकर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, निर्वाह आदेशांची अंमलबजावणी अधिनियम, १९२१, असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व विस्तार.**

[७][(२) त्याचा विस्तार, [८][ जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून*] संपूर्ण भारतभर आहे.

**२.** या अधिनियमात, विषय किंवा संदर्भ यांनुसार कोणतीही गोष्ट प्रतिकूल नसेल तर,— **व्याख्या.**

" संक्षिप्त अधिकारितेचे न्यायालय " याचा अर्थ, मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याचे किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याचे न्यायालय, असा आहे ;

" अवलंबित " याचा अर्थ, जिच्याविरुद्ध निर्वाह आदेश दिला आहे, अशी व्यक्ती म्हणून ती, ज्यामध्ये निर्वाह आदेश दिलेला आहे अशा [९][ प्रतियोगी राज्यक्षेत्रामध्ये ] अंमलात असलेल्या कायद्यानुसार ज्यांचा निर्वाह करण्यास जबाबदार आहे अशा व्यक्ती, असा आहे ;

[१०][" भारत " याचा अर्थ, जम्मू व काश्मीर राज्य* वगळून भारताचे राज्यक्षेत्र, असा आहे ; ]

" निर्वाह आदेश " याचा अर्थ, एखाद्या न्यायालयाने, दिवाणी किंवा फौजदारी अधिकारितेचा वापर करून, जिच्याविरुद्ध आदेश दिला आहे अशा व्यक्तीच्या पत्नीच्या किंवा इतर अवलंबितांच्या निर्वाहाकरिता रकमांचे नियतकालिक प्रदान करण्यासाठी दिलेला, पितृत्वनिश्चितीच्या आदेशाहून अन्य, असा हुकूमनामा किंवा आदेश, असा आहे ;

" विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

---

१. हा अधिनियम, १९६३ चा विनियम ६ याच्या कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे दादरा व नगर हवेलीमध्ये (दिनांक १ जुलै १९६५ रोजी व तेव्हापासून) आणि १९६८ चा अधिनियम २६ याचे कलम ३ व अनुसूची यांद्वारे, पुदुचेरी संघ राज्यक्षेत्रामध्ये विस्तारित करण्यात आला आणि अंमलात आणण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, " याच्या अन्य भागांमध्ये " या मजकुराऐवजी दाखल केला.

३. १९५१ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ व अनुसूची यांद्वारे, " भाग ख राज्यांमध्ये किंवा " हा मजकूर वगळला.

४. १९५२ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम २ द्वारे " हिज मॅजेस्टीज् डोमिनिअन ॲन्ड प्रोटेक्ट्रोरेट्समध्ये " या मजकुराऐवजी दाखल केला.

५. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, " सामील होणारी राज्ये व इतर भारतीय राज्ये " हा मजकूर वगळला.

६. १९५१ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ व अनुसूची यांद्वारे " भाग क राज्ये व भाग ग राज्ये यांमध्ये " या मजकुराऐवजी दाखल केला.

७. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, पोट-कलम (२) याऐवजी दाखल केला.

८. १९५१ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ व अनुसूची यांद्वारे " भाग ख राज्ये खेरीजकरून " या मजकुराऐवजी दाखल केला.

९. १९५२ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ३ द्वारे, " हिज मॅजेस्टीज् डोमिनिअन याच्या भागात " या मजकुराऐवजी दाखल केला.

१०. १९५१ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ व अनुसूची यांद्वारे, समाविष्ट केला.

* हा अधिनियम, अधिसूचना क्रमांक एस.ओ. ३९१२ (इ), दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९ द्वारे, जम्मू व काश्मीर संघ राज्यक्षेत्रास आणि लडाख संघ राज्यक्षेत्रास लागू करण्यात आला.

" उचित प्राधिकारी " याचा अर्थ, हा अधिनियम ज्यास लागू आहे अशा प्रतियोगी राज्यक्षेत्राच्या कायद्याद्वारे, किंवा त्यान्वये, दस्तऐवज स्वीकारण्यासाठी व पुढे पाठविण्यासाठी, नियुक्त केलेला प्राधिकारी, असा आहे ; आणि

[१][ " प्रतियोगी राज्यक्षेत्र " याचा अर्थ, कलम ३ खालील घोषणेच्या आधारे ज्याच्या बाबतीत हा अधिनियम त्या त्या वेळी लागू होतो असा, भारताच्या बाहेरील कोणताही देश किंवा राज्यक्षेत्र, असा आहे. ]

[२]* * * * *

**परस्पर व्यवस्थांची घोषणा करणे.**

[३][**३.** भारतातील न्यायालयांनी दिलेल्या निर्वाह आदेशांची, भारताबाहेरील कोणत्याही देशात किंवा राज्यक्षेत्रात अंमलबजावणी करण्यासाठी, त्या देशात किंवा राज्यक्षेत्रात कायदेशीर तरतूद अस्तित्वात असल्याबाबत केंद्र सरकारची खात्री पटली असेल तर, केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असे घोषित करता येईल की, हा अधिनियम त्या देशाच्या किंवा राज्यक्षेत्राच्या संबंधात लागू आहे आणि त्यानंतर, तो, त्यानुसार लागू असेल.]

**प्रतियोगी राज्यक्षेत्रांमध्ये दिलेल्या निर्वाह आदेशांची भारतात नोंदणी.**

**४.** (१) जेव्हा कोणत्याही प्रतियोगी राज्यक्षेत्रातील कोणत्याही न्यायालयाद्वारे कोणत्याही व्यक्तीविरुद्ध निर्वाह आदेश, देण्यात आला असेल-मग तो हा अधिनियम संमत होण्यापूर्वी किंवा त्यानंतर दिलेला असो,-आणि त्या आदेशाची प्रमाणित प्रत, त्या राज्यक्षेत्राच्या उचित प्राधिकाऱ्याद्वारे केंद्र सरकारकडे पाठविण्यात आली असेल तेव्हा अशा बाबतीत, केंद्र सरकार, त्या आदेशाची प्रत, नोंदणी करण्यासाठी [४][भारतातील] न्यायालयाच्या विहित अधिकाऱ्याकडे पाठवील, आणि ती प्रत मिळाल्यावर, आदेशाची विहित रीतीने नोंदणी करण्यात येईल.

(२) ज्या न्यायालयात, पूर्वोक्तप्रमाणे आदेशाची अशा प्रकारे नोंदणी करावयाची आहे, ते न्यायालय हे, ज्या न्यायालयाने आदेश दिला होता ते न्यायालय, केंद्र सरकारच्या मते, वरिष्ठ अधिकारितेचे न्यायालय असेल तर, उच्च न्यायालय असेल, आणि जर ते न्यायालय, केंद्र सरकारच्या मते, वरिष्ठ अधिकारितेचे न्यायालय नसेल तर, संक्षिप्त अधिकारितेचे न्यायालय असेल.

**भारतात दिलेले निर्वाह आदेश पाठविणे.**

**५.** जेव्हा [४][भारतातील] एखाद्या न्यायालयाने कोणत्याही व्यक्तीविरुद्ध निर्वाह आदेश दिलेला असेल,-मग तो या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर दिलेला असो-आणि ज्या व्यक्तीविरुद्ध तो आदेश दिला होता ती व्यक्ती प्रतियोगी राज्यक्षेत्रातील रहिवासी आहे असे त्या न्यायालयात शाबीत झाले असेल तेव्हा अशा बाबतीत, ते न्यायालय, त्या राज्यक्षेत्रातील उचित प्राधिकाऱ्यास पाठविण्याकरिता, त्या आदेशाची प्रमाणित प्रत, केंद्र सरकारकडे पाठवील.

**प्रतियोगी राज्यक्षेत्रांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तात्पुरता निर्वाह आदेश देण्याचा संक्षिप्त न्यायालयांचा अधिकार.**

**६.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध निर्वाह आदेश देण्यासाठी [४][भारतातील] संक्षिप्त अधिकारितेच्या न्यायालयाकडे विनंतीअर्ज केला असेल, आणि ती व्यक्ती, प्रतियोगी राज्यक्षेत्रातील रहिवासी आहे असे शाबीत झाले असेल तेव्हा अशा बाबतीत, न्यायालयास, त्या व्यक्तीच्या अनुपस्थितीत, साक्षीपुरावे ऐकल्यानंतर, त्या अर्जाच्या न्याय्यतेची खात्री पटली असेल तर, जर त्या व्यक्तीने न्यायालयात उपस्थित राहण्यास हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले असते तर, त्याने जो आदेश दिला असता असा कोणताही आदेश देता येईल ; परंतु, अशा प्रकरणी, असा आदेश, केवळ तात्पुरत्या स्वरूपाचा असेल, आणि अशा राज्यक्षेत्रातील सक्षम न्यायालयाद्वारे तो कायम केल्याशिवाय व कायम करण्यात येईपर्यंत, अंमलात येणार नाही.

(२) अशा कोणत्याही विनंतीअर्जाबाबत ज्यांची तपासणी केली जाते अशा प्रत्येक साक्षीदाराचा साक्षीपुरावा लेखबद्ध करण्यात येईल, आणि अशी अभिसाक्ष, त्याला वाचून दाखविण्यात येईल, आणि त्यावर त्याची स्वाक्षरी घेण्यात येईल.

(३) जेव्हा असा आदेश दिला जातो तेव्हा, न्यायालय, अशा प्रकारे घेतलेल्या अभिसाक्षी आणि जिच्याविरुद्ध आदेश दिला आहे त्या व्यक्तीवर यथोचितपणे समन्स बजावण्यात आले असते आणि ती सुनावणीला उपस्थित झाली असती तर, ज्या कारणांवरून आदेश दिला जाण्यास विरोध केला असता त्या कारणांचे निवेदन आणि त्या

---

१. १९५२ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ३ द्वारे " प्रतियोगी राज्यक्षेत्र " याच्या व्याख्येऐवजी दाखल केली.

२. १९५१ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ व अनुसूची यांद्वारे " राज्ये " याची व्याख्या वगळण्यात आली. त्याआधी ती व्याख्या विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे समाविष्ट केली होती.

३. १९५२ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ४ द्वारे, कलम ३ ऐवजी दाखल केला.

४. १९५१ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ व अनुसूची यांद्वारे " राज्यांतील " या शब्दाऐवजी दाखल केला.

व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी आणि तिचा ठावठिकाणा निश्चित करण्यासाठी न्यायालयाकडे असेल अशी माहिती यासह, त्या आदेशाची एक प्रमाणित प्रत, जिच्याविरुद्ध तो आदेश दिला असेल ती व्यक्ती जेथे राहत असल्याचे अभिकथित आहे त्या प्रतियोगी राज्यक्षेत्राच्या उचित प्राधिकाऱ्याकडे पाठविण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठवील.

(४) जेव्हा असा कोणताही तात्पुरता आदेश, प्रतियोगी राज्यक्षेत्रातील न्यायालयासमोर कायम करण्यासाठी आला असेल, आणि त्या न्यायालयाकडून तो आदेश, आणखी साक्षीपुरावा घेण्याच्या प्रयोजनासाठी, ज्या न्यायालयाने आदेश दिला असेल त्या संक्षिप्त अधिकारितेच्या न्यायालयाकडे परत पाठविण्यात आला असेल तेव्हा अशा बाबतीत, ते न्यायालय, विहित नोटीस दिल्यानंतर मूळ विनंतीअर्जाच्या पुष्ठ्यर्थ, ज्या रीतीने आणि ज्या शर्तींच्या अधीनतेने साक्षीपुरावा घेतला जातो, त्याच रीतीने आणि त्याच शर्तींच्या अधीनतेने साक्षीपुरावा घेण्याची कार्यवाही सुरू करील.

(५) जर आदेश द्यावयास नको होता, असे, अशा साक्षीपुराव्याची सुनावणी करणाऱ्या न्यायालयाला दिसून आले तर, त्या न्यायालयास तो आदेश रद्द करता येईल, परंतु, इतर कोणत्याही प्रकरणी, त्या अभिसाक्षी, केंद्र सरकारकडे पाठविण्यात येतील, आणि मूळ अभिसाक्षींवर ज्या रीतीने कार्यवाही केली जाते त्याच रीतीने त्या अभिसाक्षींवर कार्यवाही करण्यात येईल.

(६) या कलमान्वये दिलेला आदेश कायम केल्यामुळे, त्या आदेशात बदल करण्याच्या किंवा तो रद्द करण्याच्या, संक्षिप्त अधिकारितेच्या न्यायालयाच्या कोणत्याही अधिकारावर कोणताही परिणाम होणार नाही :

परंतु, मूळ आदेशात बदल करणारा किंवा तो रद्द करणारा आदेश दिल्यावर, न्यायालय, त्याची एक प्रमाणित प्रत, जेथे मूळ आदेश कायम केला होता, किंवा कायम करण्यासाठी जेथे तो पाठविला होता त्या प्रतियोगी राज्यक्षेत्राच्या उचित प्राधिकाऱ्यास पाठविण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठवील, आणि मूळ आदेशात बदल करणारा आदेश दिला असेल त्याबाबतीत, असा आदेश, ज्या रीतीने मूळ आदेश कायम केला जातो त्याच रीतीने कायम केल्याशिवाय व कायम करण्यात येईपर्यंत कोणत्याही प्रकारे अंमलात येणार नाही.

**भारताबाहेर दिलेला निर्वाह आदेश कायम करण्याचा संक्षिप्त अधिकारितेच्या न्यायालयाचा अधिकार.**

**७.** (१) जेव्हा एखाद्या प्रतियोगी राज्यक्षेत्रातील एखाद्या न्यायालयाकडून निर्वाह आदेश देण्यात आला असेल, आणि तो आदेश केवळ तात्पुरत्या स्वरूपाचा असेल, आणि [१][भारतातील] संक्षिप्त अधिकारितेच्या एखाद्या न्यायालयाने कायम केल्याशिवाय आणि कायम करण्यात येईपर्यंत, कोणत्याही प्रकारे अंमलात आला नसेल, आणि साक्षीदारांच्या अभिसाक्षी व ज्या कारणांवरून आदेश दिला जाण्यास विरोध केला असता त्या कारणांचे निवेदन यांसह, त्या आदेशाची एक प्रमाणित प्रत, केंद्र सरकारकडे पाठविण्यात आली असेल, आणि जिच्याविरुद्ध तो आदेश देण्यात आला असेल ती व्यक्ती भारतातील रहिवासी असल्याचे, केंद्र सरकारला दिसून आले असेल तेव्हा अशा बाबतीत, केंद्र सरकारला, तो आदेश का कायम करण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्यासाठी त्या व्यक्तीला फर्माविणारे समन्स काढण्यात यावे या मागणीपत्रासह उक्त दस्तऐवज, संक्षिप्त अधिकारितेच्या न्यायालयाच्या विहित अधिकाऱ्याकडे पाठविता येतील, आणि असे दस्तऐवज व मागणीपत्र प्राप्त झाल्यावर, न्यायालय, असे समन्स काढील आणि अशा व्यक्तीवर ते बजावण्याची व्यवस्था करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेले समन्स, आपल्या मूळ फौजदारी अधिकारितेचा वापर करताना न्यायालयाने काढलेले समन्स असल्याचे सर्व प्रयोजनांसाठी मानण्यात येईल.

(३) जिच्यावर समन्स काढण्यात आले होते ती व्यक्ती, जर मूळ कार्यवाहीमध्ये पक्षकार राहिली असती तर, तिने जो बचाव केला असता असा कोणताही बचाव, सुनावणीच्या वेळी करण्याची, तिला मोकळीक असेल, परंतु, ती अन्य कोणताही बचाव करणार नाही, आणि जिच्याविरुद्ध आदेश दिला होता ती व्यक्ती कार्यवाहीत पक्षकार राहिली असती तर, ज्या कारणांवरून आदेश दिला जाण्यास तिने विरोध केला असता ती कारणे नमूद करणारा तात्पुरता आदेश, ज्या न्यायालयाने दिला असेल त्या न्यायालयाकडील प्रमाणपत्र हे, ज्या कारणांवरून हरकत घेता येईल ती कारणे तीच असल्याचा निर्णायक पुरावा असेल.

(४) जर समन्स बजावलेली व्यक्ती सुनावणीच्या वेळी हजर राहिली नाही किंवा, हजर झाल्यावर, आदेश कायम केला जाऊ नये याबाबत न्यायालयाचे समाधान करण्यास ती निष्फळ ठरली असेल तर, न्यायालयास त्या त्या वेळी [१][भारतात] अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे त्याच्या अधिकारावर कोणत्याही द्रव्यविषयक

---

१. १९५१ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ व अनुसूची याद्वारे " राज्यांतील " या शब्दाऐवजी दाखल केला.

मर्यादा लादल्या असल्या तरी, एकतर फेरबदल न करता किंवा साक्षीपुराव्याची सुनावणी केल्यानंतर न्यायालयास योग्य वाटतील अशा फेरबदलांसह आदेश कायम करता येईल :

परंतु, या कलमान्वये, तात्पुरत्या आदेशात प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने, निर्वाह म्हणून कोणतीही रक्कम दिली जाणार नाही किंवा तशी कोणतीही रक्कम वसूल केली जाणार नाही.

(५) जिच्यावर समन्स काढले होते ती व्यक्ती सुनावणीस हजर असेल आणि कोणताही बचाव करण्याच्या प्रयोजनार्थ, कोणताही आणखी पुरावा घेण्यासाठी, ज्या न्यायालयाने तात्पुरता आदेश दिला होता त्या न्यायालयाकडे ते प्रकरण प्रेषित करणे आवश्यक आहे याबाबत न्यायालयाची खात्री पटवून दिली असेल तर, न्यायालयास, त्या प्रयोजनार्थ, अभिलेखाची एक प्रमाणित प्रत, प्रतियोगी राज्यक्षेत्राच्या उचित प्राधिकाऱ्यामार्फत त्या न्यायालयाकडे पाठविण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठविता येईल, आणि कार्यवाही स्थगित करता येईल.

(६) जेव्हा या कलमान्वये तात्पुरता आदेश कायम करण्यात आला असेल तेव्हा अशा बाबतीत, जणू काही तो आदेश मूलतः कायम करणाऱ्या न्यायालयाकडून देण्यात आला होता, असे समजून, त्यात फेरबदल करता येतील किंवा तो रद्द करता येईल, आणि जेव्हा रद्द किंवा फेरबदल करण्यासाठी विनंती अर्ज केल्यावर, ते प्रकरण, आणखी कोणताही पुरावा घेण्याच्या प्रयोजनासाठी, ज्या न्यायालयाने तात्पुरता आदेश दिला होता त्या न्यायालयाकडे प्रेषित करणे आवश्यक आहे याबाबत न्यायालयाची खात्री पटली असेल तेव्हा अशा बाबतीत, न्यायालयास, त्या प्रयोजनार्थ, अभिलेखाची एक प्रमाणित प्रत, प्रतियोगी राज्यक्षेत्राच्या उचित प्राधिकाऱ्यामार्फत त्या न्यायालयाकडे पाठविण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठविता येईल, आणि कार्यवाही स्थगित करता येईल.

**निर्वाह आदेशांची अंमलबजावणी.**

**८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, जेव्हा एखाद्या आदेशाची या अधिनियमान्वये एखाद्या उच्च न्यायालयात नोंदणी करण्यात आली असेल तेव्हा अशा बाबतीत, त्या आदेशास, अशा नोंदणीच्या दिनांकापासून, जणू काही तो, त्याच्या दिवाणी अधिकारितेचा वापर करताना उच्च न्यायालयामध्ये, किंवा याबाबतीत उच्च न्यायालयाकडून नामनिर्देशित करण्यात येईल अशा, त्या उच्च न्यायालयाला दुय्यम असणाऱ्या दिवाणी न्यायालयामध्ये मूलतः प्राप्त करण्यात आलेला आदेश होता, असे समजून, तीच शक्ती आणि तोच प्रभाव असेल आणि त्यावर सर्व कार्यवाह्या करता येतील आणि न्यायालयास त्यानुसार आदेशाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार असेल.

(२) या अधिनियमान्वये ज्या न्यायालयात आदेशाची नोंदणी करण्यात आली असेल किंवा या अधिनियमान्वये ज्या न्यायालयाकडून आदेश कायम करण्यात आला असेल, अशा संक्षिप्त अधिकारितेच्या न्यायालयास, आणि अशा न्यायालयाच्या अधिकाऱ्यास, त्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, विहित करण्यात येतील असे अधिकार असतील आणि ते अशी कर्तव्ये पार पाडतील.

**निर्वाह आणि इतर खर्च व आकार या स्वरूपात निवाडा दिलेल्या रकमा पाठविण्याच्या आकारांचे प्रदान.**

**९.** या अधिनियमाच्या तरतुदींनुसार निर्वाह आदेशाची नोंदणी करणारे किंवा कायम करणारे न्यायालय असा निदेश देईल की, निर्वाह म्हणून निवाडा दिलेली रक्कम, ज्या न्यायालयाकडून आदेश प्राप्त झालेला असेल किंवा, यथास्थिति, ज्या न्यायालयाने तात्पुरता आदेश देण्यात आला असेल त्या न्यायालयाकडे पाठविण्याचा, आकार, जिच्याविरुद्ध अशा प्रकारे आदेश देण्यात आला असेल किंवा कायम करण्यात आला असेल त्या व्यक्तीकडून सोसण्यात येईल, आणि निर्वाह म्हणून निवाडा दिलेल्या रकमेसह, आणि, न्यायालयाकडून निवाडा देण्यात येईल किंवा आकारण्यात येईल असे इतर खर्च व आकार यांच्यासह, आणि त्याच रीतीने, तिच्याकडून वसूल करण्यात येईल.

**न्यायालयाच्या अधिकाऱ्यांनी सही केलेल्या दस्तऐवजांचा पुरावा.**

**१०.** या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ [१][भारता] बाहेरील न्यायालयाच्या न्यायाधीशाने किंवा अधिकाऱ्याने सही केली असल्याचे अभिप्रेत असणारा कोणताही दस्तऐवज, एतद्‌विरुद्ध शाबीत होईपर्यंत, त्यावर स्वाक्षरी केली असल्याचे दिसून येणाऱ्या व्यक्तीच्या, न्यायिक किंवा शासकीय क्षमतेच्या सहीच्या पुराव्याशिवाय अशा प्रकारे सही केली असल्याचे मानण्यात येईल, आणि न्यायालयाच्या ज्या अधिकाऱ्याने एखाद्या दस्तऐवजावर सही केली आहे तो अधिकारी, एतद्‌विरुद्ध तरतूद करण्यात येईपर्यंत, दस्तऐवजावर सही करण्यासाठी न्यायालयाचा उचित अधिकारी असल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९५१ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ व अनुसूची, यांद्वारे " राज्या " या शब्दाऐवजी दाखल केला.

**११.** कोणत्याही प्रतियोगी राज्यक्षेत्रातील न्यायालयात घेतलेल्या अभिसाक्षी, या अधिनियमाखालील संक्षिप्त अधिकारितेच्या न्यायालयासमोरील कार्यवाह्यांमध्ये, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, पुरावा म्हणून स्वीकारता येतील. **अभिसाक्षी पुरावा म्हणून स्वीकारणे.**

**१२.** [१][(१)] केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ [२][**राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम [३]करता येतील] आणि विशेषतः, या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीचा खर्च किंवा आकार वसूल करण्यासाठी आणि ज्या विहित करण्याचे निदेशित केले आहे किंवा परवानगी दिली आहे अशा सर्व बाबींसाठी नियम करता येतील. **नियम करण्याचा अधिकार.**

[४][(२) या अधिनियमान्वये केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते, एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवण्यात येईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले अथवा तो नियम करू नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले तर, त्यानंतर तो नियम, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

---

१. १९८३ चा अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ व अनुसूची यांद्वारे, कलम १२ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला (दिनांक १५ मार्च, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ व अनुसूची यांद्वारे, " नियम करता येतील " या मजकुराऐवजी, हा मजकूर दाखल केला (दिनांक १५ मार्च, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. अशा नियमांसाठी, **भारताचे राजपत्र,** १९२३, भाग १, पृष्ठ १२६३ पहा.

४. १९८३ चा अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ व अनुसूची यांद्वारे, हा मजकूर समाविष्ट केला (१५ मार्च १९८४ रोजी व तेव्हापासून).